23/11/2020

# परिक्षा विभाग

सर्व सहाय्यक/सहयोगी प्राध्यापकांना सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2020-2021 च्या विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन करणेसाठी 20 गुणांची 02 ऑनलाईन टेस्ट (Online Exam Test) MCQ Pattern प्रमाणे आपण आपल्या विषयाच्या परिक्षा/Test आयोजित करुन त्याचा निकाल व अहवाल परिक्षा विभागात जमा करावा.

- MCQ Test - 1 - 25 Nov to 30 Nov. 2020
- MCQ Test - 2 - 04 Dec to 08 Dec. 2020

सोबत -
- विद्यापिठाचे पत्र

परिक्षा विभाग

Principal
A.D.M.S.P. Sanstha's
Late Annasaheb R.D.Deore
Arts & Science College
Mhasadi, Tal. Sakri, Dist Dhule

NBDeore

HPatil
23/11/2020

Hade ([illegible])
23/11/2020

DBhamare 23/11/2020

23/11/2020

23/11/20

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/३०९५/२०२० दिनांक: १७/११/२०२०

प्रति,

१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक.

२) कबचौउमविंतर्गत सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि विभागांचे मा.विभागप्रमुख

विषय : विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मुल्यमापनाबाबत........

संदर्भ : मा.अधिष्ठाता मंडळातील ठराव क्र. ०२/२०२०, दिनांक १०.११.२०२०.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे संलग्नीत महाविद्यालये/ परिसंस्था तसेच विद्यापीठ प्रशाळा/ विभागातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात न बोलविता ऑनलाईन माध्यमाद्वारे अध्यापन करण्यात येत आहे.

कोवीड-१९ ची एकंदरीत परिस्थिती लक्षात घेता, विद्यापीठाने यापूर्वी ठरवून दिलेल्या निकषानुसार विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणे शक्य होणार नसल्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कामकाज हे ऑनलाईन माध्यमातून पुर्ण करुन घेण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मुल्यमापनासंदर्भात अद्याप कोणत्याही मार्गदर्शक सुचना प्राप्त झालेल्या नसल्याने, तसेच अंतर्गत मुल्यमापनाबाबत ब-याच महाविद्यालयांकडून विचारणा केली जात असल्यामुळे, सदरचा विषय मा. अधिष्ठाता मंडळापुढे विचारार्थ सादर करण्यात आला असता, मा. अधिष्ठाता मंडळाने खालील ठराव संमत केलेला आहे.

**मा.अधिष्ठाता मंडळ ठराव क्र.०२/२०२०, दिनांक १०.११.२०२०**

"कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थी प्रत्यक्ष महाविद्यालयात येत नसल्यामुळे यापूर्वी ठरवून दिलेल्या निकषानुसार त्यांचे मूल्यमापन करणे शक्य नसल्यामुळे तसेच या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कामकाज हे ऑनलाईन माध्यमातून पुर्ण करुन घेण्यात येत असल्याने या विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन हे प्रत्येकी २०-२० गुणांच्या ०२ ऑनलाईन टेस्ट MCQ पॅटर्नप्रमाणे घेण्यात याव्यात."

तरी विद्यापीठाच्या मा. अधिष्ठाता मंडळाने विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मुल्यमापनासंदर्भात पारीत केलेल्या उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना अवगत करावे व त्यासंदर्भात कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

(भ. प्र. पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Scanned with CamSc